RNI No. MAHBIL/2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष १, अंक ४८(२)] बुधवार, जुलै १, २०१५/आषाढ १०, शके १९३७ [पृष्ठे ११, किंमत : रुपये १५.००

### असाधारण क्रमांक १००

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग**

गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकुल, ७ वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१, दिनांक ३० जून २०१५

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक आपना-११०५/प्र.क्र.१८३/पापु-१५.—भारताच्या संविधान याच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या नियंत्रणाखालील भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, संचालनालय, पुणे यातील सहसंचालक (अभियांत्रिकी) (गट-अ) आणि मुख्य खोदन अभियंता (गट-अ) या पदांवरील सेवाप्रवेश विनियमित करणारे पुढली नियम करीत आहेत :—

१. या नियमांना, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा संचालनालयातील सहसंचालक (अभियांत्रिकी) आणि मुख्य खोदन अभियंता (गट-अ) सेवाप्रवेश नियम, २०१५ असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(क) " आयोग " याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग असा आहे.

(ख) " पदवी " याचा अर्थ, सांविधिक विद्यापीठाची पदवी, असा आहे.

(ग) " संचालनालय " याचा अर्थ, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, असा आहे.

(घ) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे.

३. संचालनालयातील सहसंचालक (अभियांत्रिकी) (गट-अ) या पदावरील नियुक्ती, एकतर—

(क) संचालनालयातील मुख्य खोदन अभियंता हे पद धारण करणाऱ्या आणि त्या पदावर किमान तीन वर्षे नियमित सेवा केलेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठता लक्षात घेऊन काटेकोर निवडीच्या आधारे योग्य व्यक्तीला पदान्नतीद्वारे नियुक्त करण्यात येईल, किंवा

(ख) पदान्नतीकरिता योग्य उमेदवार उपलब्ध नसल्यास, जे उमेदवार

(एक) ४५ वर्षांपेक्षा अधिक वयाचे नाहीत, परंतु या अगोदरच शासनाच्या सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिल करण्यात येईल ;

(दोन) यंत्र अभियांत्रिकी किंवा स्वयंचलित अभियांत्रिकी यामधील पदवी अथवा शासनाने तिच्या समतूल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता धारण करीत आहेत ;

(तीन) वेगवेगळ्या रचनांमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या खोदन यंत्रांनी खोदन करण्याचा आणि पर्यवेक्षी कामाचा दहापेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीचा प्रत्यक्ष अनुभव धारण असलेले आहेत ;

(चार) वेधन यंत्रे, वायुसंपीडके, उपज चाचणी साधन (यील्ड टेस्टिंग इक्विपमेंट), विविध प्रकारचे पंप संच आणि तत्सम बाबींचे परिरक्षण व दुरूस्ती करण्याबाबतचे पुरेसे ज्ञान असलेले आहेत ;

(पाच) प्रस्तावांची छाननी आणि ते मंजूर करण्याचा ५ वर्षांचा अनुभव धारण असलेले आहेत ;

(सहा) प्रकल्पाकरिता आवश्यक सॉफ्टवेअर तयार करण्याचे व त्याचे संकल्पन करण्याचे पुरेसे ज्ञान असलेले आहेत, —

अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल.

परंतु, असामान्य अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्हीही धारण करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत आयोगाच्या शिफारसीवरून शासनाकडून उच्च वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिल करण्यात येईल.

४. संचालनालयातील मुख्य खोदन अभियंता (गट-अ) या पदावरील नियुक्ती एकतर—

(क) संचालनालयामध्ये वरिष्ठ खोदन अभियंता हे पद धारण करणाऱ्या आणि त्या पदावर किमान तीन वर्षे नियमित सेवा केलेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठता लक्षात घेऊन काटेकोर निवडीच्या आधारे योग्य व्यक्ती पदोन्नतीद्वारे नियुक्त करण्यात येईल, किंवा

(ख) जे उमेदवार—

(एक) ४५ वर्षांपेक्षा अधिक वयाचे नाहीत, परंतु या अगोदरच शासनाच्या सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिल करण्यात येईल ;

(दोन) यंत्र अभियांत्रिकी किंवा स्वंयचलित अभियांत्रिकी यामधील पदवी अथवा शासनाने तिच्या समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणीतीही अर्हता धारण करीत आहेत ; आणि

(तीन) वेगवेगळ्या रचनांमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या खोदन यंत्रानी खोदन करण्याचा आणि पर्यवेक्षी कामाचा दहा वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीचा प्रत्यक्ष अनुभव असलेले आहेत ;

(चार) वेधणयंत्रे, वायुसंपीडके, उपज चाचणी साधन (यील्ड टेस्टिंग इक्विपमेंट), विविध प्रकारचे पंप संच आणि तत्सम बाबींचे परिरक्षण व दुरुस्ती करण्याबाबतचे पुरेसे ज्ञान असलेले आहेत ;

—— अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल,

परंतु, भांडार खरेदी व परिरक्षण यामधील अथवा भूजल खोदनामधील (ग्राऊंड वॉटर ड्रीलींग) अथवा दोन्हीमधील अनुभव असेल अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

परंतु, आणखी असे की असामान्य अर्हता अथवा अनुभव अथवा दोन्हीही असणाऱ्या उमेदवारांच्याबाबतीत आयोगाच्या शिफारशीवरून शासनाकडून उच्च वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिल करण्यात येईल.

५. मुख्य खोदन अभियंता (गट-अ) या पदावर पदोन्नती व नामनिर्देशन याद्वारे ५०:५० या प्रमाणात नियुक्ती करण्यात येईल.

६. सहसंचालक (अभियांत्रिकी) किंवा मुख्य खोदन अभियंता या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती केलेली व्यक्ती दोन वर्षांच्या कालावधीसाठी परिविक्षाधीन असेल. परिविक्षा कालावधी जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत वाढविता येईल. पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने त्या पदाकरीता विहित केलेले प्रशिक्षण घेणे व विहीत केलेली विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणे आणि परिविक्षाकालावधी यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक असेल. जर त्याने/तिने परिविक्षाकालावधी यशस्वीरित्या पूर्ण केला नाही किंवा विहीत विभागीय परिक्षा उत्तीर्ण केली नाही किंवा त्या पदाकरीता तो/ती योग्य नसल्याचे आढळून आले तर सूचना न देता त्याची/तिची सेवा समाप्त केली जाण्यास तो/ती पात्र असेल.

७. नियम ३ व ४ यामध्ये उल्लेखिलेल्या पदांवर नियुक्त केलेल्या व्यक्तीने विभागीय परीक्षा आणि हिंदी व मराठी भाषा परीक्षा याअगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील अथवा या परीक्षा उत्तीर्ण होण्यातून तिला सूट मिळालेली नसेल तर, या संदर्भात करण्यात आलेल्या नियमांनुसार या परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.

८. नियम ३ व ४ यामध्ये उल्लेखिलेल्या पदांवर नियुक्त केलेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेले संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र धारण केलेले असणे आवश्यक आहे.

९. नियम २, ३ व ४ मध्ये उल्लेखिलेल्या पदावर नियुक्त केलेली व्यक्ती, महाराष्ट्र राज्यात कोठेही तिची बदली केली जाण्यास पात्र असेल.

## सहसंचालक (अभियांत्रिकी) पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या

(१) तो खोदन कार्यक्रमांतर्गत सर्व अभियांत्रिकी कामांचे संनियंत्रण करील.

(२) खोदन कामांच्या गुणवत्तेची तसेच खोदन कामांसाठी खरेदी केलेली साधनसामग्री, यंत्रसामग्री आणि साहित्य यांच्या देखील गुणवत्तेची सुनिश्चिती करण्यासाठी तो अभियंत्यांना मार्गदर्शन करील.

(३) तो खोदन व संलग्न अभियांत्रिकी कामांमध्ये कार्यरत सर्व कर्मचारी वर्गास आवश्यक ते तंत्रविषयक मार्गदर्शन करील.

(४) तो सुलभ, कार्यक्षम व कमी खर्च लागणारी खोदन कामे करण्यासाठी अभियंत्यांना व इतर संबंधितांना मार्गदर्शन करील. खोदन कर्मचारी वर्गाचे खोदनविषयक ज्ञान अद्ययावत करण्यासाठी तो त्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करील.

(५) तो मागणीनुसार खोदन उपकरण संच भाड्याने घेण्याची योजना करील आणि त्यांच्या प्रगतीचे संनियंत्रण करील.

(६) सरकारी उपकरण संचाचे (इतर संलग्न यंत्रसामग्रीचे प्रचलन आणि देखभाल दुरुस्ती) आणि हायड्रोफ्रॅक्चरींग युनिटे, वायुसंपीडके, उत्स्फोटन (ब्लास्टींग) युनिटे, ग्राऊटिंग यंत्रे व सर्व प्रकारची वाहने यासारख्या, याकरिता कराव्या लागणाऱ्या खरेदीचे तो नियोजन करील.

(७) तो आवश्यकतेनुसार पंप साधनसामग्री व तिची उपसाधने यांची निवड व खरेदी करण्याबाबत नियोजन व व्यवस्था करील.

(८) तो अपारंपरिक पुन:प्रभारण प्रकल्प प्रस्ताव तयार करण्याकरिता आणि हे प्रकल्प कार्यक्षमरित्या व कमी खर्चामध्ये पूर्ण करण्याकरिता अभियंत्यांवर आणि अभियांत्रिकी कामांमध्ये कार्यरत संबंधित कर्मचारी वर्गावर देखरेख ठेवील व त्यांना मार्गदर्शन करील. अपारंपरिक प्रकल्पांच्या अंमलबजावणीमध्ये नवीन पद्धती सुरू करण्यासाठी तो मार्गदर्शन करील.

(९) खोदन कार्यक्रम व अपारंपरिक पुन:प्रभारण प्रकल्प अंमलात आणण्यामधील अभियांत्रिकीय व खोदनविषयक समस्या सोडविण्यासाठी तो मार्गदर्शन करील.

(१०) तो हातपंप व विद्युतपंप यांचे परिणामकारक व कार्यक्षम प्रचालन व देखभाल करण्याकरीता सल्ला देईल आणि आवश्यकता असल्यास संबंधितांचे ज्ञान अद्ययावत करण्यासाठी तो प्रशिक्षण व कार्यशाळा घेण्याची व्यवस्था करील.

(११) तो नवीन यंत्रसामग्री खरेदी करण्यासाठी आणि जुनी झालेली यंत्रसामग्री व साधनसामग्री यांची विल्हेवाट करण्यासाठी सर्वंकष सल्ला देईल.

(१२) तो संचालकांना अहवाल देईल आणि संचालकांनी करण्याचा आदेश दिलेली अन्य कोणतीही कामे तो पार पाडील.

## मुख्य खोदन अभियंता पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या

(१) तो, अपारंपरिक उपाययोजना (युसीएम) प्रकल्पांच्या कार्यान्वयनाचे नियंत्रण व पर्यवेक्षण करील आणि प्रकल्पास तांत्रिक मान्यता देईल.

(२) तो प्रकल्प अहवाल तयार करताना अपारंपरिक उपाययोजना (युसीएम) प्रकल्पांच्या योग्य पद्धतींबाबत वरिष्ठ खोदन अभियंता आणि जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक आणि उपअभियंता यांना मार्गदर्शन करील.

(३) तो, प्रकल्पाचे कार्यान्वयन पडताळण्यासाठी प्रकल्पक्षेत्रास भेट देईल.

(४) तो, प्रकल्प कार्यान्वयनाच्या वेळी उद्‌भवणाऱ्या अभियांत्रिकी अडचणी सोडवील.

(५) प्रकल्पात काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचारी यांचे तांत्रिक कौशल्य सुधारण्याच्या उद्देशाने तो त्यांना प्रशिक्षित करील.

(६) तो, अपारंपरिक उपाययोजना (युसीएम) प्रकल्पांच्या कार्यान्वयनामध्ये नवीन पद्धती शोधण्याचा प्रयत्न करील.

(७) तो, जागतिक बँक प्रकल्पांसहित विविध योजनांच्या अंतर्गत यंत्रसामग्री आणि साधनसामग्रींची खरेदी आणि सेवा यांसाठीचे प्रस्ताव सहसंचालकांकडे सादर करील. तो, वरिष्ठ खोदन अभियंत्यांच्या समन्वयाने, प्रकल्पाच्या स्वरूपाच्या अनुषंगाने यंत्रसामग्रीमध्ये फेरबदलही करील.

(८) तो, विविध स्त्रोतांच्या आधारे, पाणीपुरवठा योजनांसाठीच्या आधारभूत माहितीचे संकल्पन, संकलन आणि परिरक्षण करील.

(९) तो, उद्वहन साधनांच्या तंत्रज्ञानात सुधारणा करण्यासाठी संशोधन आणि विकासविषयक अभ्यास करील.

(१०) भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेची सर्व यंत्रसामग्री आणि वाहने त्याच्या नियंत्रणाखाली असतील.

(११) त्याच्या वरिष्ठांनी नेमून दिलेली इतर कोणतीही कर्तव्ये तो, सहसंचालक (अभियांत्रिकी) यांना सहाय्य करील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेश कुमार,**
शासनाचे प्रधान सचिव.

## पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, ७ वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१, दिनांक ३० जून २०१५

## अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक आपना.११०५/प्र.क्र. १८३/पापु-१५.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि या संदर्भात करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या नियंत्रणाखालील भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा संचालनालयातील मुख्य भूभौतिक तज्ञ (गट-अ) या पदावरील सेवाप्रवेश विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा संचालनालयातील मुख्य भूभौतिक तज्ञ (गट-अ) (सेवाप्रवेश) नियम, २०१५ असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(क) " आयोग " याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग असा आहे.

(ख) " पदवी याचा अर्थ, सांविधिक विद्यापीठाची पदवी असा आहे.

(ग) " संचालनालय " याचा अर्थ भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे असा आहे.

(ठ) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

३. संचालनालयातील मुख्य भूभौतिक तज्ञ (गट-अ) या पदावरील नियुक्ती एकतर—

(क) संचालनालयातील वरिष्ठ भूभौतिक तज्ञ हे पद धारण करणा-या आणि त्या पदावर किमान तीन वर्षे नियमित सेवा केलेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठता लक्षात घेऊन काटेकोर निवडीच्या आधारे योग्य व्यक्तीला पदोन्नतीद्वारे नियुक्ती करण्यात येईल, किंवा

(ख) पदोन्नतीकरिता योग्य उमेदवार उपलब्ध नसल्यास जे उमेदवार—

(एक) ४५ वर्षांपेक्षा अधिक वयाचे नाहीत, परंतु या अगोदरच शासनाच्या सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिल करण्यात येईल ;

(दोन) भूभौतिकीमधील पदव्युत्तर पदवी अथवा शासनाने तिच्या समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता धारण करीत आहेत ;

(तीन) उपरोक्त उपखंड (दोन) मध्ये नमूद केलेली अर्हता संपादन केल्यानंतर ७ वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीकरिताचा भूभौतिकी कामांचा प्रत्यक्ष अनुभव धारण करीत आहेत, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल.

परंतु, जे उमेदवार—

(क) कोणत्याही संस्थेमध्ये भूभौतिकीय क्षेत्रीय काम केल्याचा जबाबदारीच्या पदावरील अनुभव असलेले आहेत आणि ज्यांनी स्वतंत्र क्षेत्र नकाशारेखन, पूर्वेक्षण व सर्वेक्षण केलेले आहे अथवा त्याचे पर्यवेक्षण केलेले आहे, आणि

(ख) भूभौतिकीच्या कोणत्याही शाखेमध्ये संशोधन निबंध प्रसिद्ध केलेला आहे,

अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल :

परंतु, आणखी असे की, असामान्य अर्हता अथवा अनुभव अथवा दोन्हीही असणा-या उमेदवारांच्या बाबतीत आयोगाच्या शिफारशीवरुन शासनाकडून उच्च वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिल करण्यात येईल.

४. मुख्य भूभौतिक तज्ञ या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती दोन वर्षांच्या कालावधीसाठी परिविक्षाधीन असेल. परिविक्षा कालावधी जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत वाढविता येईल. नियुक्त केलेल्या व्यक्तीने त्या पदाकरिता विहीत केलेले प्रशिक्षण घेणे व विहीत केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आणि परिविक्षाकालावधी यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक आहे. जर त्याने/तिने परिविक्षाकालावधी यशस्वीरित्या पूर्ण केला नाही किंवा विहित विभागीय परीक्षा उत्तीर्ण केली नाही किंवा त्या पदाकरिता तो/ती योग्य नसल्याचे आढळून आले तर सूचना न देता, त्याची/तिची सेवा समाप्त केली जाण्यास तो/ती पात्र असेल.

५. मुख्य भूभौतिक तज्ञ या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने विभागीय परीक्षा आणि हिंदी व मराठी भाषा परीक्षा या अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील अथवा या परीक्षा उत्तीर्ण होण्यातून तिला सूट मिळालेली नसेल तर, या संदर्भात करण्यात आलेल्या नियमांनुसार या परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.

६. मुख्य भूभौतिक तज्ञ या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेले संगणक हाताळण्याबाबतचे प्रमाणपत्र धारण केलेले असणे आवश्यक आहे.

## विशेष कार्य विभागांतर्गत मुख्य भूभौतिक तज्ञाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या

(१) त्याने भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या भूभौतिकीय सर्वेक्षण कार्यक्रमांचे नियोजन, कार्यक्रम आखणी व अंमलबाजावणी केली पाहिजे.

(२) त्याने भूभौतिकीय सर्वेक्षण कार्यक्रमांच्या कामावर नियंत्रण, त्याबाबत मार्गदर्शन व त्याचे पर्यवेक्षण केले पाहिजे.

(३) तो लक्ष्यित प्रकल्प स्थळाच्या भूभौतिकीय सर्वेक्षणाच्यावेळी भेट देईल, प्रादेशिक/जिल्हा भूभौतिकीय युनिटकडून ते अंमलबाजावणी पूर्वी व नंतर करून घेईल.

(४) तो, जिल्हा कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या अहवालाच्या आधारे, प्रकल्पाच्या व्यवहार्यतेबाबतचे आपले निष्कर्ष सादर करील.

(५) प्रकल्प क्षेत्रात कोणतीही विशिष्ट संरचना असल्याबाबत संशोधन व विकास कक्षाने दिलेल्या माहितीची पडताळणी करील आणि संशोधन व विकास कक्षाला आवश्यक ती माहिती पुरवील. त्याच्या वरिष्ठांनी त्याला वेळोवेळी करण्याचे आदेश दिलेल्या अन्य कोणत्याही कर्तव्यांचे पालन करील.

(६) तो भूभौतिकीय सर्वेक्षण कार्यक्रमाशी (प्रोग्रॅमर) सबंधित बाबींवर संचालकांना सल्ला देईल.

(७) भूभौतिकीय शास्त्रामधील साधनसामग्री व विकास याबाबत तो अद्ययावत माहिती ठेवील.

(८) ग्लोबल पोझिशनिंग पध्दती भूभौतिकीय लॉगिंग याबाबत तो प्रशिक्षण देईल, पर्यवेक्षण करील आणि मार्गदर्शन करील.

(९) तो, भूभौतिकीय सर्वेक्षण तंत्रे अद्ययावत ठेवण्यास आणि या यंत्रणेकडील भूभौतिकीय साधनसामग्री सुस्थितीत ठेवण्यास जबाबदार असेल.

(१०) राज्याच्या वार्षिक भूभौतिकीय अहवालाचे संकलन करण्यास तो जबाबदार असेल.

(११) त्याच्या वरिष्ठांनी सोपविलेली अन्य कोणतीही कर्तव्ये.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेश कुमार,**
शासनाचे प्रधान सचिव,